# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र
## दिनांक 24 / 10 / 2017

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि 23 / 10 / 2017 रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या (37) वाहन चालकाविरुध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन 7400 /– रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**<u>वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण करणाविरुध्द अपराध दाखल</u>**

दिनांक 23 / 10 / 2017 रोजी वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहन चालकावर पोस्टे.कळमनुरी हद्दीत कलम 283 भा.द.वि. प्रमाणे (03) गुन्हे दाखल करण्यात येवुन. यातील आरोपीतांनी आपले ताब्यातील वाहन सार्वजनीक रस्त्यावर लावुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांचे जीवीतास धोका व अटकाव निर्माण होईल अशा स्थितीत लावल्यामुळे त्यांचे विरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असुन या संदर्भात पोलीस तपास करीत आहेत.

**दुखापत :–**

दिनांक 23 / 10 / 2017 रोजी फिर्यादी मनोजलाल गुबलाल सतिवाले रा. बावन्नखोली हिंगोली यांचे फिर्यादी वरुन पोस्टे हिंगोली शहर येथे कलम 324.323.504.34 भादवी प्रमाणे फिर्यादीचे घरासमोर बावन्नखोली येथे फिर्यादीस व साक्षीदारास नमुद आरोपीने संगणमत करुन आम्हाला घरा समोर थांबु नका असे का म्हणता या कारणावरुन फिर्यादीस शिवीगाळ करुन लाकडाने डावे पायाचे पंजावर मारुन जखमी करुन रक्त निघाले व लाथा बुक्याने पाठीत पोटात मारुन मुक्का मार दिला फिर्यादीची बहीन गिता हीस आरोपीने हातातील चाकुने उजवे हाताचे पोटरीवर मारुन जखमी केले असुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करीत आहेत.

दिनांक 23 / 10 / 2017 रोजी फिर्यादी मन्मथ नानाअप्पा पत्रे रा.थोरवा ता.वसमत यांचे फिर्यादी वरुन पोस्टे वसमत ग्रामीण येथे कलम 324.323.504.506.34 भादवी प्रमाणे मौजे थोरवा शिवारात यातील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तुझे औताचे बैल आमचे शेतातुन का वळवितोस या कारणावरुन आ.कं. 1 ने काठीने मारुन डोके फोडून जखमी केले व आ.कं. 2 ने तोंडावर बुकी मारुन जखमी केले व थापडा बुक्याने मारहान करुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली असुन या संदर्भात वसमत ग्रामीण पोलीस तपास करीत आहेत.

दिनांक 23 / 10 / 2017 रोजी फिर्यादी राजेश परसराम पवार रा.तिखाडी यांचे फिर्यादी वरुन पोस्टे बासंबा येथे कलम 324.323 भादवी प्रमाणे मौजे तिखाडी येथे फिर्यादीचे घरी यातील नमुद फिर्यादीस नमुद आरोपीताने माझी पत्नी कोमल हिस आताच का पाठवत नाही असे म्हणुन पत्नीस लाथा बुक्याने मारहान केली व माझी आई सोडविण्यास गेली असता हातातील जब्याने मारतांना वार चुकविल्यामुळे माझे डोक्यास बेंड आले व माझे आईचे हातास मनगटाजवळ खरचटले आहे व मुक्का मार लागला असुन या संदर्भात बासंबा पोलीस तपास करीत आहेत.

**<u>चोरी :–</u>**

दिनांक 23 / 10 / 2017 रोजी फिर्यादी कांचन राधेशाम नोनारे रा.बि.ॲन्ड सी शासकीय निवासस्थान हिंगोली यांचे फिर्यादी वरुन पोस्टे हिंगोली शहर येथे कलम 454.457.380 भादवी प्रमाणे माधव हॉस्पीटल चे पाठीमागील बि.ॲन्ड सी कॉर्टर हिंगोली येथे कोणीतरी अज्ञात चोरट्याने शासकीय निवास्थानाचे लॉक तोडून निवासस्थानात घुसुन एक सोनी कंपनीची टि. व्ही. व एच पी कंपनीचा लॅपटॉप असा एकूण 27.000रु चा माल चोरुन नेला असुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करीत आहेत.

**सुर्यास्त ते सुर्योदयादरम्यान संशईतरित्या फिरणाऱ्या आरोपी विरुध्द अपराध दाखल:–**

दिनांक 23 / 10 / 2017 रोजी सुधीर भिमराव कंबरे नै.पोस्टे हिंगोली शहर यांचे फिर्यादवरुन पोस्टे हिंगोली शहर ये कलम 122 मपोका प्रमाणे दिनांक 23 / 10 / 2017 रोजी 22.05 वा यातील नमुद ईसम हा रेल्वे स्टेशन रोड मार्कट कमीटीच बाजुला हिंगोली सुर्यास्तानंतर ते सुर्योदय दरम्यान आपले अस्तीत्व लपवून भिंतीचे आंलसावलीत एखादा माला विरुध्द दखपलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने दबा धरुन बसलेला असतांना मिळून आलेले असून त्यांचे विरुध्द गुन्हे दाखल करण्या आले असून या संदर्भात हिंगोली पोलीस तपास करीत आहेत.

पोलीस अधिक्षक हिंगोली
करीता